# प्रस्तावना

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील प्राचीन शहर असून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय व व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. कोल्हापुरातील वस्तुसंग्रहालयांच्या विकासास पूरक परिस्थिती घटकामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कोल्हापूरला लाभलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी. इ.स.पू. २०० वर्षापासूनचा कोल्हापूरचा इतिहास ज्ञान आहे. ब्रह्मपुरी ही कोल्हापूरची आद्य वसाहत मानली जाते. सातवाहन काळात कोल्हापूरच्या नागरीकरणास सुरुवात झाली व रोमन साम्राज्याशी व्यापारी संबंध निर्माण झाले. चालुक्य काळात महालक्ष्मी देवालयाची निर्मिती झाल्याने कोल्हापूरला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. शिलाहार काळात पन्हाळगड हे राजधानीचे ठिकाण झाल्याने राजकीय महत्त्व वाढीस लागले. मध्ययुगीन काळात अनेक निर्णयात्मक लढायांचा साक्षीदार आणि राजकीय उलथा-पालथीचा भाग होता. कोल्हापूरजवळील पन्हाळगडाने इतिहासात आपली कायम स्वरुपाची छबी उमटवली आहे. १७१० मध्ये महाराणी ताराबाईंनी पन्हाळगडावर दुसऱ्या मराठा गादीची स्थापना करून स्वतंत्र कोल्हापूर राज्याची कोनशिला रोवली. राजर्षि शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरच्या सर्वांगिण विकासास प्रारंभ झाला. सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडून आले. संगीत, नाट्य, चित्रकला, चित्रपट, क्रीडा, भेदीक, तमाशा व मर्दानी खेळ इ. क्षेत्रात कोल्हापूरचे स्वतःचे सांस्कृतिक वैशिष्ट्य निर्माण झाले. या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा संग्रहालयाच्या उदयास तत्सम सहाय्यभूत घटक म्हणून फायदा झाला. एकंदरीत ऐतिहासिक पार्श्वभूमीवर कोल्हापूरमधील विविध वस्तुसंग्रहालयांची निर्मिती झालेली आहे.

कोल्हापूरचे विविध अंगानी विशेष संशोधन झालेले आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील तुलनेत कोल्हापूरातील संग्रहालयांचे सांस्कृतिक महत्त्व असून सुद्धा त्यांचा अभ्यास आणि संशोधन झालेले नाही. कोणत्याही संशोधकांनी आपल्या संशोधनाचा विषय केलेला नाही. म्हणून आपल्या सांस्कृतिक वारशाचे प्रतिनिधीत्व करत असलेली ही संग्रहालये अभ्यासकाकडून दुर्लक्षित राहिली असून ही त्रूटी काही अंशी दूर

करण्याच्यादृष्टीने या विषयाची निवड केलेलीआहे. एकविसाव्या शतकात पर्यटन हा उद्योगाच्या स्वरुपात पुढे येत आहे. कोल्हापूरातील विविध संग्रहालये पर्यटकांना आकर्षित करून घेणारा स्त्रोत आहेत. या बदलत्या आर्थिक पार्श्वभूमीवर येथील वस्तुसंग्रहालयांचा त्यांच्या सांस्कृतिक महत्त्वाबरोबर पर्यटनाच्या दृष्टिकोणातून अभ्यास होणे गरजेचे वाटल्याने ''कोल्हापूर शहरातील वस्तुसंग्रहालयांच्या संदर्भातून ऐतिहासिक अभ्यास'' हा विषय निवडला आहे. संग्रहालयांचा अभ्यास आणि संशोधन करण्याची मानसिकता आणि दृष्टी बी.ए. आणि एम.ए. चा अभ्यास करता असताना आली. एम.ए. भाग दोन मध्ये असताना "Historical Application in Tourism" हा वेगळा विषय निवडला. जागतिकीकरण काळातील पर्यटन क्षेत्राचे वाढते महत्त्व ध्यानात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने इतिहासाच्या नव्या अभ्यासक्रमात या विषयाचा अंतर्भाव कलेला आहे. हा विषय अभ्यासताना इतिहासाकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी तयार झाली. विद्यापीठाच्या इतिहास विभागामार्फत शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. या सहलीच्या माध्यमातून पर्यटन अभ्यासाचा दृष्टिकोन तयार झाला आणि पर्यटनशास्त्राच्या मूलभूत घटकांच्या आधारे भेट दिलेल्या पर्यटन स्थळाची नोंद आणि मांडणी करण्याचा व्यवहारिक अनुभव लाभला. त्याच्या परिणाम स्वरुप मी या नवीन संशोधन क्षेत्राची निवड केली.

कोल्हापूर शहरातील वस्तुसंग्रहालयांचा पद्धतशीर अभ्यास झालेला नाही.त्यामुळे या संग्रहालयांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे ग्रंथ उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रस्तुत शोध प्रबंधासाठी प्रदर्शित वस्तुंच्या संदर्भातून उपलब्ध प्रकाशित प्राथमिक व दुय्यम साधन ग्रंथ, वृत्तपत्रे, मुलाखती व प्रश्नावली इ. संदर्भ साधन म्हणून उपयोग केला आहे. यामध्ये श्री. स.मा. गर्गे व यशवंतराव तस्ते यांनी संपादित केलेले 'अखेरचा मुजरा', डॉ. शां.भा. देव लिखित 'महाराष्ट्र एक पुरातत्वीय समालोचन' व 'महाराष्ट्रातील उत्खनने', डॉ. एच.डी. सांकलिया व डॉ. एम.जी. दीक्षित, लिखित 'एक्सकॅव्हेशन अॅट ब्रह्मपुरी' श्री. ना.व. पवार लिखित 'कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाची मार्गदर्शिका', सी. शिवराममूर्ती लिखित, 'भारतीय संग्रहालयाची निर्देशिका, श्री. आर.व्ही. सबनीस लिखित 'नोटस् ऑन कोल्हापूर', डॉ.

नी,पु. जोशी लिखित 'भारतीय मूर्तीशास्त्र', आर.व्ही. सबनीस लिखित, 'नोटस् ऑन कोल्हापूर', माधवराव बागल लिखित, 'कोल्हापूरचे कलावंत', डॉ. माणिकराव लिखित, 'प्रतापशास्त्रागार', श्री. आ.बा. लट्ठे लिखित, 'श्रीमंत छत्रपती शाहु महाराज यांचे चरित्र', श्री. ग.र. भिडे व पु.ल. देशपांडे यांनी संपादित केलेले 'कोल्हापूर दर्शन', द.चि. मुजुमदार यांनी संपादित केलेला 'व्यायाम ज्ञानकोश', श्री. श्यामकांत जाधव लिखित 'रंग चित्रकारांचे', श्री. वि.श्री. चोपदार लिखित, 'ओळख ऐतिहासिक मर्दानी खेळांची', शहाजी छत्रपती म्युझियम संक्षिप्त परिचय, वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय परिचयय पुस्तिका इ. प्रमुख प्रथा शिवाय वृत्तपत्रे, प्रश्नावली, मुलाखती व एम.फिल., पीएच.डी. अप्रकाशित शोध प्रबंधाची संदर्भ साधन ग्रंथ म्हणून मदत झाली.

प्रस्तुत शोध प्रबंध मुख्य सात प्रकरणात खालीलप्रमाणे केलेला आहे.

१) कोल्हापूर - एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप

२) वस्तुसंग्रहालय - एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप

३) कोल्हापूर वस्तुसंग्रहालय

४) शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय

५) वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय

६) वस्तुसंग्रहालय - एक पर्यटन स्त्रोत

७) उपसंहार

**'कोल्हापूर - एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप'** या प्रथम प्रकरणामध्ये कोल्हापूर शहरामधील वस्तुसंग्रहालये ज्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर निर्माण झत्तली. त्या संग्रहालय निर्मितीस सहाय्यक ठरलेल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. यामध्ये ब्रह्मपुरीची प्राचीन वसाहत, ब्रह्मपुरीचे उत्खनन व कोल्हापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी व सांस्कृतिक, शैक्षणिक कार्याला राजर्षि शाहूंनी दिलेला उदार राजाश्रय व त्यातून त्यांचा झालेला विकास यांचा धावता आढावा घेतलेला आहे.

यासाठी डॉ. एच.डी. सांकलिया व डॉ. एम.जी. दीक्षित लिखित 'एक्सकॅव्हेशन ॲट ब्रह्मपुरी',श्री. पी.टी. मालसे लिखित, 'कोल्हापूर ए स्टडी इन अर्बन जिऑग्राफी', श्री. ग.रा. भिडे व पु.ल. देशपांडे यांनी संपादित केलेले 'कोल्हापूर दर्शन', बा.प्र. मोडक लिखित 'कोल्हापूर प्रांताचा इतिहास', डॉ.कि.क. चौधरी यांनी संपादित केलेले 'कोल्हापूर जिल्ह्याचे गॅझेटियर' या साधन ग्रंथाची मदत झाली. कोल्हापूरच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय घटना संदर्भात कविता गगराणी यांचा 'राईज अॅण्ड ग्रोथ ऑफ फिल्म इंडस्ट्री इन द प्रिन्स्ली स्टेट ऑफ कोल्हापूर' हा एम.फिल. शोध प्रबंध, श्री. आय.एच. पठाण यांचा 'कोल्हापूर ए स्टडी ऑफ ट्वेन्टी फिव इयर ऑफ इंडस्ट्रियल डेव्हलपेंट' या पीएच.डी. शोध प्रबंधाची मदत झाली.

**'वस्तुसंग्रहालय - एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप'** या द्वितीय प्रकरणामध्ये वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व व व्याख्या, वस्तुसंग्रहालयांचा युरोपमधील उदय आणि विकास व त्यामागील प्रेरक घटक, भारतातील वस्तुसंग्रहालयाचा उदय आणि विकास व त्यामागील प्रेरक घटक, संग्रहालय विकासातील अडचणी, संग्रहालयाचे प्रकार व भारतातील विविध राज्यामध्ये अस्तित्वात असलेल्या संग्रहालयांची संख्यात्मक तुलना केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात मुख्यत्वे करून सी. शिवराममूर्ती लिखित, 'भारतीय संग्रहालयाची निर्देशिका' डॉ. रा.रा.बारकर व डॉ. उत्तम सावंत लिखित 'भारतीय पुरातत्वशास्त्र व्ही.पी. डिव्हाईव्हेडी यांनी संपादित केलेले 'म्युझियम अॅण्ड म्युझिऑलॉजी न्यू होरीजन्स, एस्.जे. बक्षी लिखित 'मॉडर्न म्युझियम्स', डॉ. मोतीचंद्रा यांनी संपादित केलेले 'द जनरल ऑफ इंडियन म्युझियम्स', हरिशचंद्र वर्मा यांनी संपादित केलेले 'मध्यकालीन भारत' व प्रा. आर.डी. गायकवाड लिखित, 'इतिहास लेखन पद्धती व ऐतिहासिक स्थळे व स्मारके यांचा अभ्यास' या प्रमुख साधन ग्रंथांची मदत झाली.

**'कोल्हापूर वस्तुसंग्रहालय'** या तृतीय प्रकरणामध्ये या संग्रहालयाची स्थापना का झाली. संग्रहालय वास्तूचे वैशिष्ट्य व संग्रहालयाचा विकास व व्याप्ती स्वरुप याचा आढावा घेतलेला आहे. पुरातत्व विभाग,शिल्पाकृती विभाग, पंचधातू विभाग, व्यक्तिचित्र

विभाग, संकीर्ण विभाग व निसर्गचित्र विभाग इ. विभागात प्रदर्शित वैशिष्ट्यपूर्ण पुरातत्वीय वस्तू. शिल्पाकृती, भांडी, संकीर्ण कलाकृती, चित्रकलाकृती यांचे महत्त्व व वैशिष्ट्यांसह प्रदर्शित सर्व वस्तूची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत प्रकरणात श्री. ना.व. पवार लिखित 'कोल्हापूर वस्तू संग्रहालयाची मार्गदर्शिका' डॉ. एच.डी. सांकलिया व डॉ. एम.जी. दीक्षित, 'एक्सकॅव्हेशन अॅट ब्रह्मपुरी', डॉ. नी.पु. जोशी लिखित, 'भारतीय मूर्तीशास्त्र', डॉ. शरयु दोशी यांनी संपादित केलेले 'महाराष्ट्र', शां.भा, देव लिखित, 'महाराष्ट्र : एक पुरातत्वीय समालोचन' व महाराष्ट्रातील उत्खनने, श्यामकत जाधव लिखित 'रंग चित्रकारांचे' व महादेव शास्त्री जोशी यांनी संपादित केलेल्या 'भारतीय संस्कृती कोशाची' मदत झाली. याशिवाय दै. पुढारीच्याा सन १९५८, १९७४, १९८२ व १९९० मधील अंकांची मदत झाली व चित्रकार उल्हास जोशी व श्यामकांत जाधव यांच्या मुलाखतीचा व त्यांनी केलेल्या चित्र समीक्षेचा प्रस्तुत शोध प्रबंधात मदत झाली.

**'शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय'** या चौथ्या प्रकरणामध्ये शहाजी छत्रपती संग्रहालय स्थापनेची भूमिका व संग्रहालय स्थापना आणि विकास, वस्तुसंग्रहालयाची वास्तू व त्याची वैशिष्ट्ये, शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय विश्वस्त मंडळाने केलेले कार्य व अंबारीचे दालन, संकीर्ण कलाकृती दालन, शहाजी छत्रपती दालन, छत्रपती शाहू दालन, छायाचित्र दालन, शस्त्रास्त्र दालन व शिकार दालन इ. दालनात प्रदर्शित वैशिष्ट्य पूर्ण वस्तू,अलंकार, राजचिन्हे, छायाचित्रे, पोषाख इ. माध्यमातून तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर व महत्त्वपूर्ण घटनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. साठमारीचे हत्यारे व छायाचित्रे यांच्या माध्यमातून या दुर्मिळ मर्दानी खेळाची माहिती, शिकार केलेल्या पशु-पक्षाच्या माध्यमातून तत्कालीन शिकार पद्धती व वैशिष्टयपूर्ण शस्त्रास्त्राच्या माध्यमातून तत्कालीन शस्त्रास्त्र ज्ञानता व युद्ध तंत्रात झालेला बदल अभ्यासनाचा व प्रदर्शित संकीर्ण वस्तुची माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात श्री. स.मा. गर्गे व यशवंतराव तस्ते यांनी संपादित केलेले 'अखेरचा मुजरा', डॉ.माणिकराव लिखित, 'प्रतापशस्त्रागार', श्री.द.वि. मुजुमदार यांनी संपादित

केलेला 'व्यायाम ज्ञानकोश', आ.बा.लट्ठे लिखित, 'श्रीमंत छत्रपी शाहु महाराज यांचे चरित्र', पी.बी. साळुंखे यांनी संपादित केलेला 'राजर्षि शाहू गौरव ग्रंथ', आर.व्ही. सबनीस लिखित 'नोटस् ऑन कोल्हापूर', श्री. वि.श्री. चोपदार लिखित, 'ओळख ऐतिासिक मर्दानी खेळांची', 'डॉ. जी.एन्. पंत लिखित' 'स्टडीज इन इंडियन वेपन्स ॲण्ड वॉर फेयर' व 'भारतीय अस्त्रशस्त्र', 'शहाजी छत्रपती म्युझियम संक्षिप्त परिचय पुस्तिका' इ. संदर्भ ग्रंथाची मदत झाली.

**वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय** या पाचव्या प्रकरणामध्ये शिवाजी विद्यापीठाची हे संग्रहालय स्थापन करणे पाठीमागची भूमिका व प्रदर्शित विविध वस्तू, छायाचित्रे, ग्रंथ, हस्तलिखिते, पुरस्कार व सन्मान यांच्या माध्यमातून वि.स. खांडेकर यांचे जीवन व कार्य, त्यांचे साहित्यिक योगदान व त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत प्रकरणात 'संग्रहालय प्रकल्प अहवाल', श्री. मि.ज्ञा. पाटील यांनी संपादित केलेले 'कोल्हापूरची मोठी माणसं', डॉ. सुशिलकुमार लवटे यांचा 'वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालयावरील लेख', वि.स. खांडेकर स्मृतीसंग्रहालय परिचय पुस्तिका व खांडेकरांचे लेखनिक अनंत कुंभोजकर व खांडेकरांचे पुत्र अविनाश खांडेकर यांच्या मुलाखतीची मदत झाली.

**वस्तुसंग्रहालय – एक पर्यटन स्त्रोत** या सहाव्या प्रकरणामध्ये कोल्हापूर मधील वस्तुसंग्रहालयाची कोल्हापूरच्या पर्यटन विकासातील भूमिका, शैक्षणिक दृष्टिकोणातून महत्त्व अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. पर्यटनाची व्याख्या, बदललेले स्वरुप व त्यामध्ये ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्टिकोणातून प्राप्त झालेले महत्त्व यांचा आढावा घेतलेला आहे. कोल्हापुरात येणारे एकूण पर्यटक व वस्तुसंग्रहालयास भेट देणारे पर्यटक यांचा उपलब्ध आकडेवारीवरून तुलनात्मक अभ्यास केला आहे व वस्तुसंग्रहालयाचा पर्यटन विकासातील अडचणी याचा परामर्श घेतलेला आहे. प्रस्तुत प्रकरणास रतनदिप सिंह लिखित, 'टूरिझम टूडे' ए.के. भाटिया लिखित 'इंटरनॅशनल टूरिझम' व संग्रहालयातील अभिप्राय नोंदवही व पर्यटकांच्याकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीची मदत झाली.

**'उपसंहार'** या सातव्या प्रकरणामध्ये एकूण शोध विषयासंदर्भात निष्कर्ष काढलेले आहेत. यामध्ये संग्रहालयत स्थापने पाठीमागील प्रेरक घटक, आर्थिक घटक, इतिहासलेखनातील वस्तुसंग्रहालयाचे साधनात्मकमहत्त्व व प्रदर्शित वस्तूच्या माध्यमातून तत्कालिन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीवर कशा प्रकारे प्रकाश पडतो यासंदर्भात निष्कर्ष काढलेले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. (इतिहास) पदवी परीक्षेसाठी ''कोल्हापूर शहरातील वस्तुसंग्रहालयांचा पर्यटनाच्या संदर्भातून ऐतिहासिक अभ्यास'' या विषयावरील शोध प्रबंध सादर करत असताना मला अत्यानंद होत आहे. या संशोधन कार्यात ज्याचे अनमोल मार्गदर्शन, सहकार्य व प्रोत्साहान लाभले त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य मानतो. हा शोध प्रबंध पूर्ण करत असताना इतिहास विभागाचे प्रमुख आदरणीय डॉ. ए.आर. भोसले सर, डॉ. एम.ए. लोहार सर, डॉ. नंदा पारेकर मॅडम, डॉ. पद्‌मजा पाटील मॅडम, डॉ. कविता गगराणी मॅडम, अवनिश पाटील सर, या सर्व गुरुवर्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन, सूचना, प्रोत्साहन व सहृदयतेने केलेले सहकार्य लाभले. त्यामुळे ऋणनिर्देशाची केवळ औपचारिकता पूर्ण करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे आवडेल. ज्यांच्या कष्टाच्या जाणीवेतून मला शिक्षणाची प्रेरणा मिळाली. ज्यांच्या प्रेरणेतून हा शोधप्रबंध साकार झालेला आहे. ते माझे आई-नाना यांचा मला भावुकतेने उल्लेख करावाया वाटतो. त्यांनी मला कायमचे ऋणाईत ठेवले आहे. माझ्या बहिणीनी या शोध कार्यास प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ दिले. विद्यापीठ अनुदान आयोगाने माझ्या या शोध कार्यासाठी ''राजीव गांधी नॅशनल फेलोशिप'' घोषित करून माझ्या सारख्या नव तरुण संशोधकाला प्रेरणा देण्याचे काम केले. त्यांचा या ठिकाणी विशेषाने उल्लेख करावासा वाटतो. याशिवाय दुर्मिळ विभागातील डॉ. बापूसाहेब माने व शफिक देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे व उपकुलसचिव निचितेसाहेब यांनी विद्यापीठातील संग्रहालयाची कागदपत्रे व संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले, त्याबद्दल त्यांचे आभार. माझे सहस्नेही बबली गावडे, हनुमंत जाधव, डॉ. उन्नुस शेख, रमजान सय्यद, शिवाजी जाधव, अर्चना पाटील,

रेश्मा गवसणे, प्रताप हिंगमिरे, रमेश खोत, प्रा. संभाजी माने, प्रा. वसंत मळगे, सचिन कांबळे, तानाजी हवालदार,नामदेव लवटे, संजय पांढरे, संजय नवले, दत्ता यलपले, गजानन काशीद, संजय शिंदे, अर्चना जाधव या सर्व सहकारी मित्रांचे सहकार्य झाले. या सर्वांच्या सहकार्यातून व प्रोत्साहनातून मला प्रबंध पूर्ण करण्यासमदत झाली. इतिहास विभागातील लेखनिक उदय खेडकर, विद्यापीठातील अनिल जाधव व राम तुपे तसेच या प्रबंधाचे संगणक टंकलेखन करण्याचे काम श्री. विष्णु खाडे यांनी वेळेत पूर्ण करून वेळोवळी सहकार्य केले या सर्वांच्या विषयी मी अत्यंत कृतज्ञ आहे.

– **सुरेश वसंत शिखरे**

-----